-१३-

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त द्वितीय अपील**

**अपील क्र.३७०/२०१४**

जा.क्र.अ.क्र.३७०/२०१४/५५०२/१६
दिनांक - २५/११/२०१६

"निर्णयीत"

अर्जदार तथा अपीलार्थी,
श्री बाबाराव ज्ञानबा महाले,
मु.पो.कळंबा महाली, ता.जि.वाशिम

**विरुध्द**

१.प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
वाशिम, ता.जि.वाशिम

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,
कृषि उत्पन्न बाजार समिती,
वाशिम ता.जि.वाशिम

**आदेश**

अर्जदार यांनी जोडपत्र "अ" दि.२२/१०/२०१३ अन्वये जन माहिती अधिकारी तथा सचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती, वाशिम यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ अन्वये अर्ज करुन कृषि उत्पन्न बाजार समिती, वाशीम परिसरात C.C.T.V. कॅमेरे बसविण्याबाबत १० मुद्दयांवर माहिती मागितली. त्यानंतर अपिलार्थीने दि.२८/११/२०१३ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, कृषि उत्पन्न बाजार समिती, वाशिम यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. तथापि, सदर प्रथम अपीलाची सुनावणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशीम यांनी दि.६/१२/२०१३ रोजी घेतली व लेखी आदेश निर्गमित केले की, जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, वाशिम यांनी अर्जदार यांना त्यांनी मागणी केलेली माहिती निशुल्क द्यावी. त्यानंतर अपीलार्थीने कलम १९(३) अन्वये दि.२१/०१/२०१४ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यासाठी आयोगाच्या कार्यालयातुन दि.२१/०१/२०१६ रोजी अपीलार्थी व उत्तरवादी १ व २ यांना नोटीस काढून दि.१६/०२/२०१६ रोजी आयोगाच्या कार्यालयामध्ये सुनावणीसाठी हजर राहण्यासंबंधी कळविण्यात आले होते.

या प्रकरणात दि.१६/०२/२०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री बी.एन.कोल्हे,सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वाशिम उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांचेतर्फे श्री भगवान हरिभाऊ इंगळे,सहसचिव,कृषि उत्पन्न बाजार समिती,वाशिम व ॲड.वी.व्ही.हेरोळे हे उपस्थित होते.

प्रस्तुत प्रकरणी दि.२५/७/१६ रोजी पुन्हा सुनावणी घेण्यात आली. सुनावणीस अपीलार्थी गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे श्री आर.एल.हिवाळे, सहा.निबंधक सह.संस्था वाशीम व जन माहिती अधिकारी तर्फे श्री यु.आर.महाले प्र.लेखापाल कृ.उ.बा.स. वाशीम उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, वाशिम यांचे वतीने ॲड.हेरोळे यांनी दि.१६/२/१६ रोजी समक्ष तोंडी खुलासा केला. त्यांनी सांगितले की, मा.राज्य माहिती आयुक्त खंडपिठ,औरंगाबाद यांचेकडील याचिका क्र.३५८८/२०१४ मध्ये दि.१५/०१/२०१५ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये नमुद केले आहे की, कृषि उत्पन्न बाजार समित्यांचा अधिनियमातील कलम २(ज) मधील सार्वजनीक प्राधिकरणाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होणार नसल्यामुळे अशा कृषि उत्पन्न बाजार समित्यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदी लागू होत नाहीत. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमाखालील अर्जाप्रमाणे माहिती देणे जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, वाशिम यांचेवर बंधनकारक नाही. त्यामुळे त्यांनी अर्जदार यांना माहिती दिलेली नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांच्या वतीने सहा.निबंधक, सहकारी संस्था, वाशिम, श्री कोल्हे यांनी दि.१६/२/१६ रोजी तोंडी खुलासा

केला की, त्यांना मा.राज्य माहिती आयोग, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशाची माहिती नव्हती म्हणून त्यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलार्थीस माहिती देण्याचे आदेश दिले. पण ते आदेश योग्य आहेत.

प्रकरणातील उपरोक्त परिस्थिती पाहता, राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील अपील क्र.३५८८/२०१४ मधील आदेश दि.१५/०१/२०१५ प्रमाणे जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, वाशिम यांनी अर्जदारास माहिती देणे बंधनकारक नाही. कृषि उत्पन्न बाजार समितीला माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागु होत नाही असा निर्णय राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेला आहे. परंतु हा आयोग त्यांच्याशी सहमत नाही कारण त्यानंतर मा.उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत की, कृषि उत्पन्न बाजार समिती शासनाने घटित व स्थापित केलेले सार्वजनिक प्राधिकरण आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**- आदेश -**

१. अपील मंजूर करण्यात येत आहे.

२. अपीलार्थीस १५ दिवसात विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, वाशीम यांनी माहिती द्यावी.

वरीलप्रमाणे आदेश देवून अपील दि.२१/०१/२०१४ निकाली काढण्यात येते

(वसंत द.पाटील)
राज्य माहिती आयुक्त
अमरावती खंडपीठ, अमरावती

T/Jiskar